दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १२२ वा शुक्रवार दि.१८ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## लातूरची स्पर्धा मराठवाड्यासोबत नाही तर देशासोबत- आमदार धिरज देशमुख

### महायुतीने कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा,माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा सवाल; कार्यकर्त्यांशी साधला संवाद

लातूर / प्रतिनिधी :- निवडणुकीच्या यशाची सुरुवात लातूरपासून झाली पाहिजे. शिक्षण, व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्रात 'लातूर पॅटर्न' आहे. आता लातूरकरांनी मताधिक्याचा पॅटर्न निर्माण करावा, असे आवाहन लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी कार्यकर्त्यांना केले. ही निवडणूक महाराष्ट्राची आहे. विधानसभेमध्ये मराठवाड्याचा आवाज तुमच्या मताधिक्याच्या ताकदीने वाढला पाहिजे, तो दिल्लीपर्यंत गेला पाहिजे हे सांगताना त्यांनी लातूरची स्पर्धा मराठवाड्यासोबत नाही तर ती सबंध देशासोबत आहे, असेही म्हटले. निवळी, मुरुड आणि एकुरगा जिल्हा परिषद गट कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीमध्ये ते बोलत होते. या संवाद बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख हे होते. व्यासपीठावर लातूर ग्रामीणचे माजी आमदार वैजनाथराव शिंदे, आबासाहेब पाटील, लक्ष्मणराव मोरे,श्रीपतराव काकडे, सुभाष घोडके, धनंजय देशमुख, संभाजी सुळ, जगदीश बावणे, रामदास पवार, पृथ्वीराज शिरसाठ, चाँदपाशा इनामदार, बाळासाहेब कदम, संतोष देशमुख, रवींद्र काळे, दैवशाला राजमाने, राजेसाहेब सवई, शिवाजी कांबळे, जनार्दन वंगवाड, आबासाहेब पाटील, रघुनाथ शिंदे, लक्ष्मण मोरे, प्रवीण पाटील, जयचंद्र भिसे, अनिल पाटील, डॉ. दिनेश नवगिरे, ईश्वरप्रसाद चांडक, अनुप शेळके, सचिन दाताळ, विश्वनाथ पाटील, अनंतराव येलगटे, रामराव ढगे, भैरवनाथ सूर्यवंशी, साजिद पटेल, निळकंठ बचाटे, दयानंद बिडवे, सचिन सूर्यवंशी, नानासाहेब जाधव, गोविंद कदम, रघुनाथ शिंदे, गुरुनाथ गवळी, जनार्दन वंगवाड, तुकाराम गोडसे आदींसह निवळी, मुरुड व एकुरगा सर्कलमधील प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूरचं पालकत्व काकांकडे

लोकनेते विलासराव देशमुख साहेबांनी ५० वर्षांपूर्वी विकासाचे रोपटे लावले. लातूरमध्ये उद्योग, शिक्षण, विमानतळ, एमआयडीसी आहे. या जिल्ह्याचे पालकत्व आता आदरणीय काकांनी स्वीकारले आहे. पाया मजबूत असल्याशिवाय इमारत उभी राहत नाही, असे सांगून लातूरची स्पर्धा मराठवाड्यासोबत नाही तर ती पश्चिम महाराष्ट्र आणि सबंध देशासोबत आहे. धिरज देशमुख पुढे म्हणाले की, लातूर मतदारसंघ हा दुसऱ्यांदा संधी देणारा एकमेव मतदारसंघ आहे. मतदारसंघाचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण सर्वजण या ठिकाणी सज्ज होऊ या, लोकसभा निवडणुकीमध्ये मराठवाड्याने नऊपैकी आठ जागेवर आपला विजय मिळवला आहे. यापुढे देखील हेच यश आपणास टिकवायचे असून महाविकास आघाडी चे सर्व उमेदवार निवडून येण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील असले पाहिजे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



महाराष्ट्रात परिवर्तन करून महाविकास आघाडीचे सरकार आणायचे आहे- सहकार महर्षी दिलीपराव देशमुख

काँग्रेस पक्षाने पूर्वीच्या काळी एक संस्कृती जोपासली होती. काँग्रेसने मराठवाड्याला शंकरराव चव्हाण, शिवाजीराव पाटील-निलंगेकर आणि विलासराव देशमुख यांच्यासारखे सुसंस्कृत मुख्यमंत्री दिले. या नेत्यांनी नेहमी विरोधकांचाही सन्मान केला. विरोधकांसोबतही सामंजस्याची भूमिका घेतली. पण आजची राज्याची परिस्थिती पाहिली की महाराष्ट्रातील राजकारणाची, राज्यकर्त्यांची भाषा, त्यांची वागणूक पाहिली तर असंच म्हणावं लागतं की, कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा, असा प्रश्न पडतो. म्हणून आता महाराष्ट्रात परिवर्तन करायचे आहे असे सांगत अमित देशमुख, धिरज देशमुख हे निवडून येतीलच या सोबत महाविकास आघाडीचे सर्व उमेदवार कसे निवडून येतील याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, जनाबाई यांच्याकडून नैतिक शिकवण महाराष्ट्राला मिळाली आहे. शाहू, फुले आंबेडकर यांचे नैतिकतेचे योगदान आहे. पण विरोधकांनी घरे फोडली, माणसे फोडली आता या मंडळींचा देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईवर डोळा आहे असा आरोप त्यांनी केला.

# सिद्धार्थ शिनगारे केज विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात

**- मी केज विधानसभा निवडणूक का लढावी ?**

केज विधानसभेतील विविध गावांमध्ये भीम जयंती,भारतीय महापुरुषांच्या महत्त्वपूर्ण दिनानिमित्त माझी व्याख्याने झाली आहेत. माझे दिवंगत मोठे बंधू सर्जेराव शिनगारे हे रिपब्लिकन चळवळीत सक्रिय होते आणि केज तालुक्यातील नेतृत्व त्यांनी संभाळले होते. जवळपास ३८ गावांमध्ये माझे विविध जातीसमूहातील मित्र आहेत,आणि माझा सामाजिक व राजकीय जनसंपर्क चांगला आहे. पुरोगामी चळवळीत काम करत असल्याने आणि संविधानाच्या सखोल अभ्यासामुळे विधानसभेत आमदार म्हणून संविधानिक कार्य करण्याची हातोटी मला आहे.केज तालुक्याच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण मांडणी करून मी समाधानकारक उपाय सुचवू शकतो.

**आंबेडकरी चळवळीचा २० वर्षांचा अनुभव**

मागील २० वर्षांपासून (२००४-२०२४) मी आंबेडकरी चळवळीत सक्रिय आहे. लेखक, वक्ता, आणि युवा विचारवंत म्हणून आंबेडकरी विचारसरणीचा प्रसार करण्यासाठी कार्यरत आहे. या दोन दशकांच्या प्रवासात मी संविधानाच्या मूल्यांवर आधारित समाज उभारणीसाठी आणि बहुजन चळवळींच्या सक्षमीकरणासाठी योगदान दिले आहे.

केज/प्रतिनिधी :- सिद्धार्थ श्रीरंग शिनगारे हे महाराष्ट्रातील एक ख्यातनाम सामाजिक कार्यकर्ता,संविधानाचे गाढे अभ्यासक,विचारवंत,लेखक,वक्ते आणि साहित्यिक आहेत. आंबेडकरवादी विचारसरणीचे ते निष्ठावंत अनुयायी असून, त्यांचे जीवन आणि कार्य राष्ट्रपिता जोतिराव फुले,राजर्षी शाहू महाराज,आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित आहे.समता,बंधुत्व,न्याय,आणि स्वातंत्र्य या मूल्यांवर आधारित समाजाची उभारणी करणे, हा त्यांच्या आयुष्याचा ध्यास आहे. व्याख्यानांद्वारे संपूर्ण महाराष्ट्र त्यांनी पिंजून काढला आहे, आणि त्यांच्या ओजस्वी वक्तृत्वामुळे जनमानसात त्यांचे विशेष स्थान निर्माण झाले आहे.एक कुशल संघटक म्हणून, त्यांनी २२ जिल्ह्यांमध्ये संघटनेचे जाळे उभारले आहे आणि प्रशिक्षित कार्यकर्त्यांची फळी तयार केली आहे.सामाजिक एकोपा निर्माण करणे, विविध समाजांमध्ये ऐक्य घडवून आणणे, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक गैरसमज दूर करणे,भारतीय संविधानाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे,आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजातील ज्वलंत प्रश्नांवर प्रबोधन करणे,ही त्यांची कार्यक्षेत्रे आहेत.ते नियमितपणे वर्तमानपत्रांमध्ये लेखन करत असून,त्यांच्या विचारशील लेखांनी व्यापक जनजागृती घडवून आणली आहे. शिनगारे यांच्या नेतृत्वाखालील संविधान जागृती अभियान हे विशेषतः लक्षवेधी ठरले आहे. संविधानाचा इतिहास, त्यातील मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये,आणि आरक्षण सारख्या मुद्यांवर एकदिवसीय कार्यशाळांच्या माध्यमातून त्यांनी जनजागृती केली आहे. समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी ते अखंडपणे संघर्ष करत आहेत.त्यांच्या कार्यामुळे, संविधानाच्या मूल्यांवर विश्वास ठेवणारा आणि त्या मार्गदर्शनाखाली कार्य करणारा एक जबाबदार कार्यकर्ता वर्ग उभा राहिला आहे.मराठवाडा आणि बीड जिल्ह्यांतील सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक,सांस्कृतिक आणि राजकीय समस्यांचा त्यांचा गाढा अभ्यास आहे.या प्रश्नांवर सखोल चिंतन करून त्यांनी अनेक आंदोलने,मोर्चे,परिषदा,चर्चासत्रे, आणि प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली आहेत. त्यांच्या वैचारिक परिपक्वतेमुळे आणि उच्चशिक्षित पार्श्वभूमीमुळे त्यांच्याकडे एक व्यापक दृष्टिकोन आहे.सामाजिक भान, राजकीय शहाणपण,आणि नेतृत्वगुण यांच्या समन्वयामुळे त्यांनी विविध संघटनांना मजबूत केले आहे आणि लोकांमध्ये व्यापक जनजागृती घडवून आणली आहे. सिद्धार्थ शिनगारे हे सोशल मीडियावर अत्यंत लोकप्रिय आहेत,आणि विशेषतः युवा वर्ग त्यांचे विचार ऐकतो,वाचतो आणि त्यांच्यामुळे प्रेरित होतो.समाजातील विषमता आणि तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींना ते तात्काळ आणि सडेतोड उत्तर देतात,ज्यामुळे सामाजिक ऐक्याला बळकटी मिळते.त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे आणि व्यापक कार्यक्षेत्रामुळे, महाराष्ट्रातील एक आदर्श समाजसेवक म्हणून त्यांची ख्याती आहे.अशा या हरहुन्नरी आणि बहुमुखी व्यक्तिमत्वाचे धनी,सिद्धार्थ शिनगारे यांची महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात असलेली भूमिका निर्विवाद आहे.



मराठा-बौद्ध ऐक्य परिषद

मराठा-बौद्ध ऐक्य परिषद या उपक्रमाचा मी मुख्य संयोजक आहे.या अंतर्गत विविध कार्यक्रम,चर्चासत्रे,व्याख्याने,आणि प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली आहेत.मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ मी कित्येक लेख लिहिले आहेत,भाषणे दिली आहेत,आणि आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवला आहे. जरांगे पाटील यांच्या आंदोलनात देखील माझा सक्रिय सहभाग राहिला आहे,आणि या आंदोलनाच्या मागण्यांना समाजात सकारात्मक प्रतिसाद मिळवून दिला आहे.

शाहीनबाग आंदोलनात सहभाग

एन आर सी, सी ए ए, एन पी आर च्या विरोधात मी बीड, गेवराई,पाटोदा,औरंगाबाद,सिल्लोड, उस्मानाबाद येथे शाहीनबाग आंदोलनात भाग घेतला आहे.या आंदोलनात अभ्यासपूर्ण मांडणी करून संविधानाच्या मूल्यांची बाजू मांडली आहे.दलित-मुस्लिम समाजातील ऐक्यासाठी सातत्याने कार्यरत राहिलो असून, या दोन समाजांमध्ये सामाजिक ऐक्य निर्माण करण्यासाठी विविध मंचांवर सहभाग घेतला आहे.

## ज्वेल ऑफ पार्क नेरूळ नवी येथील गार्डनमधे बुद्ध मूर्ती (पुतळ्याचे) भूमिपूजन आमदार मंदाताई म्हाञे यांच्या शुभहस्ते झाले

### वीरेंद्र लगाडे यांच्याकडून हार्दिक स्वागत व पुढील कार्यास मनापासून हार्दिक शुभेच्छा..!

नवी मुंबई / के. एच. हनवते :- नेरूळ येथे असलेल्या ज्वेल ऑफ नवी मुंबई ह्या सुंदर अशा गार्डनमध्ये अख्या विश्वाला शांतीचा, व प्रेमाचा संदेश देणारे महाकारूणी, तथागत, भगवंत गौतम बुद्ध यांचा भव्य असा पुतळा उभारण्यात येणार आहे, यामुळे आमच्या नवी मुंबईची शान अख्या महाराष्ट्रामध्येच नव्हे तर अख्या भारतामध्ये उंचावणार आहे. दिनांक १४/ आक्टोबर/२०२४ रोजी स्थानिक लोकप्रिय आमदार सौ. मंदाताई म्हात्रे यांच्या हस्ते गौतम बुद्धाच्या पुतळ्याच्या उभारणीचे भूमिपूजन पार पडले. हा भगवान गौतम बुद्धाचा पुतळा उभारण्यासाठी नवी मुंबईतील विविध आंबेडकरी गटातील, पक्षातील, नेत्यांनी पाठपुरावा केला होता त्यामध्ये प्रामुख्याने (आर.पी.आय) चे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : महेश खरे तसेच रिपब्लिक सेनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : वीरेंद्र लगाडे तसेच बहुजन प्रेरणा सामाजिक संस्थापक अध्यक्ष : कल्याण हनवते व इतर अशा बऱ्याच कार्यकर्त्यांनी यासाठी प्रयत्न केले होते, स्थानिक कार्यसम्राट आमदार सौ. मंदाताई म्हात्रे यांनी





पुढाकार घेऊन शासनाकडून या पुतळ्याची मंजुरी आणली व मोठ्या प्रमाणात निधी सुद्धा उपलब्ध करून दिला त्याबद्दल नवी मुंबईतील तमाम बौद्ध - आंबेडकर समाज त्यांचे आभार मानत आहेत हे काम प्रगतीपथावर व्हावे हिच सदिच्छा व पुढील कार्यास मनापासून हार्दिक शुभेच्छा..! वीरेंद्र लगाडे ( जिल्हाध्यक्ष ) नवी मुंबई रिपब्लिकन सेना यांनी दिल्या.

## भाजपच्या ११० उमेदवारांची उद्या घोषणा, अनेकांच्या पोटात गोळा!

मुंबई : विशेष प्रतिनिधी भाजपच्या ११० उमेदवारांची पहिली यादी उद्या जाहीर होणार असल्याचे म्हटले जात आहे. भाजपच्या काही विद्यमान आमदारांचे तिकीट कापले जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे अनेक विद्यमान आमदार, मंत्र्यांच्या पोटात गोळा आला आहे. भाजपचे शीव-कोळीवाडा येथील विद्यमान आमदार तमिळ सेल्वन यांचे तिकीट कापून त्यांच्या जागी प्रसाद लाड किंवा राजश्री शिरवडकर यांना तिकीट देण्याचा विचार होत आहे. वर्सोव्यात भारती लव्हेकर यांच्या ऐवजी संजय पांडे यांच्या नावाची चर्चा सुरु आहे. घाटकोपर पश्चिम येथे राम कदम यांचा पत्ता कट होणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. घाटकोपर पूर्व येथे पराग शाह यांच्या जागी प्रकाश मेहता यांचे पुनर्वसन होण्याची शक्यता आहे. बोरीवलीत सुनील राणे यांच्या जागी गोपाल शेट्टी यांचे पुनर्वसन होणार असल्याचे समजते. मुंबईतील ५ विद्यमान आमदारांना पुन्हा तिकीट दिले न जाण्याची शक्यता आहे. या ५ आमदारांच्या यादीत भाजपच्या घाटकोपर पश्चिम मतदारसंघातील विद्यमान आमदार राम कदम यांचे नाव देखील असल्याचे म्हटले जात आहे. त्यासोबतच भारती लवेकर, तमिल सेलवन, पराग शाह, सुनील राणे या विद्यमान आमदारांचा पत्ता देखील कट होण्याची शक्यता आहे.



## संपादकीय....

# को जागर्ति?

सत्ताधाऱ्यांस विविध जनकल्याण योजना जाहीर करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल याची खातरजमा करून, विविध घोषणांचा बार वेळेत उडेल याची पुरेशी दक्षता घेऊन, पंतप्रधानादी मान्यवरांचे दौरे यथासांग पार पडतील हे पाहून महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका जाहीर होतील, असे म्हटले जात होते. निवडणूक आयोगाने आपल्या कृतीने हा अंदाज रास्त ठरवला. अखेर निवडणुकीची घोषणा झाली. त्यामुळे बाकी कोणी नाही तरी निदान ज्यांच्यावर राज्य सरकारच्या तिजोरीची जबाबदारी आहे, त्यांनी तरी सुटकेचा नि:श्वास सोडला असेल. गेले काही दिवस संबंधित खात्याच्या कर्मचाऱ्यांस अहोरात्र काम करावे लागले असणार. राज्याचे नेतृत्व अनेकानेक कल्पक योजनांची खैरात करण्यात मशगूल असल्यामुळे अंतिमत: तिजोरीत किती वेगाने खडखडाट होईल, याचा जमाखर्च या अधिकाऱ्यांस सातत्याने करावा लागला असणार. गेले काही आठवडे सरकारातील प्रत्येकाच्या हातात जणू द्रौपदीच्या थाळ्याच थाळ्या असाव्यात असा भास व्हावा अशी परिस्थिती होती. जो जे वांछिल आणि न वांछिल तरीही त्यास ते ते मिळत होते. ही निवडणुकीची ताकद. जनसामान्यांचा 'एक देश एक निवडणूक' या संकल्पनेस विरोध असेल तो यासाठी. वारंवार निवडणुका म्हणजे वारंवार खैरात. ही मौज पाच वर्षांत एकदाच निवडणुका झाल्यास बंद होईल. वारंवार निवडणुका म्हणजे वारंवार पंतप्रधानादी महोदय येणार. म्हणजे वारंवार खड्डे बुजवले जाणार, साफसफाई होणार आणि स्वच्छ भारताचा प्रत्यय येणार. तेव्हा जनतेचे खरे हित 'एक देश अनेक निवडणुका' यातच आहे, यात संदेह नाही. असो. आता महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांविषयी काही यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे युती असो वा आघाडी; दोघांसही आपला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण हे सांगण्यास होत असलेली अडचण. सत्ताधारी असल्यामुळे यात जरा अधिक गोची आहे ती युतीची. खरे तर त्यांच्याकडे मुख्यमंत्री आहेत. 'लाडकी बहीण'सारख्या चमकदार योजनांची राखी मतदारांच्या मनगटावर त्यामुळे तर बांधली गेली. पण तरीही निवडणुकांनंतर एकनाथराव शिंदेच आमचे मुख्यमंत्री असतील असे ना खुद्द त्यांची शिवसेना म्हणते ना त्यांना मुख्यमंत्री करणारा भाजप म्हणतो. हे असे अजितदादांची राष्ट्रवादी म्हणाली नाही तर एकवेळ समजून घेता येईल. अजितदादांस 'अखंड उपमुख्यमंत्री भव' हा आशीर्वाद ज्याने कोणी दिला त्याची पुण्याई जबरदस्त असणार. ती संपायला तयार नाही. असे असताना 'आमचे मुख्यमंत्री एकनाथराव' हे अजितदादा कसे काय म्हणणार? परत स्वत: एकनाथरावही तसे जाहीरपणे म्हणण्यास अनमान करताना दिसतात. त्यामुळे रात्रंदिवस राब राब राबणारा, तगडा मुख्यमंत्री असूनही एकनाथरावांचे नाव कोणी घेण्यास तयार नाही. देवेंद्र फडणवीसच आमचे मुख्यमंत्री असतील, असे भाजपमध्येही कोणीही छातीठोकपणे सांगायला तयार नाही. त्याचवेळी सत्ताधारी युतीस आव्हान देणाऱ्या महाविकास आघाडीची स्थितीही अशीच. युतीकडे एक आजी आणि एक माजी मुख्यमंत्री तर विरोधी आघाडीकडे एकाच वेळी दोन-दोन माजी. एकनाथरावांच्या बंडामुळे सत्ता सोडावी लागली ते आणि काँग्रेसचे शिवाय कायमचे मुख्यमंत्रीपदकांक्षी बाळासाहेब थोरात हेही आहेत, मुख्यमंत्रीपदाभिलाषी यांस कोण विसरेल? पण तरीही त्यातील कोणी भावी मुख्यमंत्री असे काही महाविकास आघाडीतील कोणी नेते सांगण्यास तयार नाहीत. एरवी राष्ट्रवादीच्या शरदराव पवारांना असे सांगण्याची वेळ आली नसती. त्यांच्याकडे कायमस्वरूपी उमेदवार तयारच असायचा. पण आता तोच युतीत गेल्याने शरदरावांस इतकी डोकेदुखी नाही. जयंतराव पाटील यांचा स्वभाव काही असा किरकिरा नाही. त्यामुळे शरदरावांच्या डोक्यास तितका घोर नाही. तात्पर्य सत्ताधारी युती असो वा महाविकास आघाडी. दोघांसही संभाव्य मुख्यमंत्री पडदानशीन ठेवण्यातच रस दिसतो. पण हे वास्तव फक्त मुख्यमंत्रीपदाबाबतच नाही. दोन्हीकडच्या साजिंद्यांचीही तीच अवस्था आहे. कोणता पक्ष किती जागा लढवणार आहे आणि नक्की कोणत्या हेच अद्याप कोणाहीकडच्या नेत्यास माहीत नाही. ना युतीच्या धुरंधरांस तो अंदाज ना आघाडीच्या मुत्सद्द्यांस. ही परिस्थिती अभूतपूर्व अशी. कारण आपणास कोठून लढावयाचे आहे हेच निवडणुका जाहीर झाल्या तरी माहीत नाही, असे याआधी इतिहासात घडल्याची नोंद नाही. यावेळची अधिक पंचाईत म्हणजे उभय बाजूंस किमान तीन-तीन प्रत्येकी पक्ष आहेत. इतकी वर्षे जी बाब दोघांत वाटून घेताना नेत्यांचे घामटे निघायचे ते आता हीच बाब तीन तीन जणांत वाटताना उभय बाजूंच्या नेत्यांचे होणार. बरे मतदारसंघांची कशीही बेरीज केली तरी ती २८८ पेक्षा अधिक होणार नाही. या मतदारसंघांची वाटणी, तीत कोणता मतदारसंघ कोणाच्या पदरात पडणार हेच माहिती नाही. त्यामुळे सत्तेत असूनही बंडखोरीचा झेंडा फडकावण्याची वेळ युतीतील नेत्यांवरही येणार आणि आघाडीसही तीस सामोरे जावे लागणार. म्हणजे बंडखोरांचे तणही अमाप. काहीच नक्की नसल्यामुळे त्याची कापणी होण्याचीही शक्यता नाही. यात 'वोटकटवे' व्रताचे पालन करणारी वंचित बहुजन आघाडी, सर्वपक्षीय चाचपडणारे बच्चू कडूदी मान्यवर, तूर्त स्वबळाची उबळ आलेल्या राज ठाकरे यांचे 'मनसे'सैनिक इत्यादींची संख्या लक्षात घेतल्यास प्रत्येक मतदारसंघ म्हणजे गेला बाजार 'यश्टी' स्टँडसारखा दिसू लागल्यास आश्चर्य नाही. सहा प्रमुख पक्ष, त्यांचे पक्षवस्त्र असलेले फुटकळ पक्ष, अपक्ष यांची संख्या 'यश्टी' स्टँडवर तरंगणाऱ्या प्रवाशांपेक्षा किंचितशीच कमी असेल. या प्रवाशांच्या गर्दीस एकच एक चेहरा नसतो. त्यातील काही दूरवर जाऊ पाहणारे गंभीर प्रवासी असतात, काही अगदी वेळ घालवायला आलेले असतात तर काही नक्की कोठेच जायचे नाही; पण तरी मिळेल त्या बसमध्ये चढायचे असे असतात. काही तर बस कोठे जाणार हे माहीत नसतानाही खिडकीतून आत घुसून सीटवर रुमाल टाकून जागा अडवणारे असतात! आताच्या निवडणुकीतील बऱ्याच उमेदवारांस, त्यांच्या पक्षास हे वर्णन लागू पडते. आता हे असे वास्तव असल्याने प्रवास सुरू झाल्यानंतरची परिस्थिती काय असेल याची कल्पनाही करवत नाही. गेल्या पाच वर्षांत या राज्याने जी अनुभवली तशी राजकीय साठमारी अन्य कोणत्या प्रांताने क्वचितच अनुभवली असेल. लैंगिक अत्याचार, खून अशा आरोपांसाठी आधीच्या सरकारातून बाहेर पडावे लागलेली व्यक्ती पुन्हा मंत्रीपदावर नेमली जाते आणि तेव्हा तिच्या विरोधात आंदोलन करणारे आणि करणाऱ्या 'लाडकी बहीण' बनून सरकारात खांद्याला खांदा लावून बसतात. आधीच्या सरकारात महत्त्वाच्या पदांवर होते तेच आताच्या सरकारात तशाच महत्त्वाच्या पदांवर बसून 'तेव्हा' काही काम कसे झाले नाही, हे जनतेस सांगतात. हे असे सांगणारे आधीच्या सरकारातून निष्क्रियतेचे कारण सांगून बाहेर पडले म्हणावे तर तसेही नाही. पुढच्या अन्य कोणा सरकारात वर्णी लागल्यास आताच्या सरकारबाबत ही मंडळी नंतर तेच बोलणार नाहीत, याचीही हमी नाही.

# जगाची वाटचाल विनाशाकडे!

बुध्द म्हणतात माणसाने केलेल्या चांगल्या वा वाईट कृत्याचा परिणाम हा माणसालाच भोगावा लागतो.माणुस चांगले काम करेल तर त्याचा परिणाम चांगला होईल,आणि वाईट करेल तर त्याचा परिणाम वाईट होईल.माणुसच माणसाला तारु शकतो आणि माणुसच माणसाला मारु पण शकतो.शेत जसे तणाने नाश पावते,तशी मानवजात दुर्विकाराने नाश पावते.अशीच परिस्थिती सध्या जगात झालेली आपल्याला दिसत आहे.असे वाटते की स्वार्थ,लोभ,मोह जास्त वाढल्याने माणसाकडची नीतिमत्ता हरवल्याचे दिसते.

सर्व काही आपल्याच कडे असावं. सर्व आपल्यालाच मिळावं, आपल्या पेक्षा कोणी मोठं असू नये,किंवा आपल्यापेक्षा कोणी बलाढ्य नसावे,आपल्या बरोबरीतही कोणी नसावं, मीच मोठा,अशी माणसाची माणसिकता,वृत्ती झालेली आहे.आणि याच प्रकारातून अनुचित प्रकार घडताना दिसू राहिले.माणसा माणसामध्ये कुरघोडीची भावना, समाजामध्ये,देशामध्ये,जगामध्येअशीच कुरघोडीची वृत्ती पाहायला मिळते.आणि हि कुरघोडी घडत आहे,ईर्षा,द्वेष व तिरस्कार यामधून. माणूसच माणसाच्या, समाज समाजाच्या,देश देशाच्या विरोधात करत असलेल्या या कुरघोडीमुळे,आज जग विनाशाच्या टोकावर येऊन उभे राहिले आहे.

पहिल्या महायुद्धात जशी जर्मनीच्या कैसर विल्यम ने अशीच कुरघोडी करुन,युरोपमधल्या सत्ताधारी राजे व हुकूमशहा यांच्यात एकमेकांच्या विरोधात कान भरले,आणि त्यातुनच पहिल्या महायुद्धाला सुरवात झाली.पण त्याची ती कुरघोडी त्याच्याच अलंगट आली.तो म्हणजे जर्मनीचा पराभव आणि त्यालाच देश सोडून पळून जावे लागले.तशीच दुसरी कुरघोडी हिटलरने केली (जगावर राज्य करण्याची)त्यामुळे दुसरे महायुद्ध घडले,पण हिटलरला सुध्दा आत्महत्या करावी लागली,पण जपानला त्याची खूप मोठी किंमत चुकवावी लागली. (हिरोशिमा व नागासाकीच्या भयंकर नुकसानीतुन)

तीच परिस्थिती आज निर्माण झाली आहे.त्यामुळे जग केव्हा कोसळेल काही सांगता येत नाही.या सर्वांमधून तथागत बुध्दांचा दया, क्षमा, शांती करुणा व मैत्री चा संदेशच जगाला तारु शकतो. व सन्मार्गावर,शांतीच्या मार्गावर नेऊ शकतो.

सध्या परिस्थिती पाहता अशाच कुरघोडीतून गेल्या दोन वर्षांपासून रशिया युक्रेन युद्ध सुरू आहे.ते अजूनही सुरुच आहे,दोन्ही कडच कितीतरी सैन्य त्यात मारल्या गेले,व निष्पाप लोक सुध्दा मारल्या गेले.युक्रेन उध्वस्त होत असताना आपण पाहत आहो.रशियाचेही खूप मोठे नुकसान होत आहे.त्यातच इस्त्रायल व हमास युद्ध गेल्या एक वर्षापासू सुरु झालेआहे.तेही कुरघोडीतूनच त्यातही कितीतरी सैनिक मारले गेले कितीतरी निष्पाप लोक मेले व मरत आहेत.

त्यातच आता ईराणने २०० रॉकेट इस्त्रायलवर टाकून युध्दात उडी घेतली. म्हणजे शमत आलेल्या युद्धाने परत भडका घेतला आहे. जगात सध्या खूप मोठ्या प्रमाणात दारुगोळा, शस्त्रसाठा, ध्वनीच्या सातपट वेगाने जाणाऱ्या व एका तासात ७ ते ८ हजार किलोमीटरचे अंतर गाठणाऱ्या मिसाइल,ड्रोन,टँक,फाइटर जेठ विमाने, पाणबुड्या,बॉम्ब,व हजारो अणुबॉम्ब बनुन तयार आहेत. त्यातील अर्ध्याहून जास्त शस्त्रसाठा व अणुबॉम्ब रडारवर आहेत.हे अणुबॉम्ब भुदल, नौदल आणि वायुदल या तीनही ठिकाणी तैनात करण्यात आले आहे.

म्हणजे तिसऱ्या महायुद्धाची ही चाहुलच आहे. केव्हा चिणगी पडेल आणि केव्हा महायुद्धाचा भडका उडेल काही सांगता येत नाही. आणि असे हे तिसरे महायुद्ध जर घडले (घडू नये)तर त्याचा परिणाम म्हणजे जगाचा विनाश!

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरावर जे अणुबॉम्ब टाकले,त्याने फक्त ते शहरच उध्वस्त झाले.पण आता जगात असे अणुबॉम्ब बनवून तयार आहेत,हिरोसिमा व नागासाकीवर जे अणुबॉम्ब टाकले त्याच्या एक लाख पटीने पावरफुल.एक अणुबॉम्ब एक देश उध्वस्त करु शकतो. एवढे शक्तीशाली.मग जगात तारणाऱ्यापेक्षा मारणारे शस्त्र जास्त प्रमाणात उपलब्ध आहेत.समजून घ्या परिस्थिती किती गंभीर आहे.

ज्या देशाने अणुबॉम्ब पासून वाचण्यासाठी कवच (मोठमोठे बंकर)किंवा हवेतच नष्ट करण्याचे यंत्र बनवलेले आहे. अशेच देश काही प्रमाणात सुरक्षित राहतील.बाकी देशाचे मरण मात्र अटल आहे.

अमेरिका जगात महाशक्ती आहे. तो देश लेझरद्वारे हवेतच बॉम्ब नष्ट करण्याचे यंत्र शोधत आहे.

अमेरिका व इस्त्रायलने असेच कवच (आयरन ड्रोन) तयार केले आहे. ते हवेतच बॉम्ब, मिसाइल नष्ट करु शकते.

युरोपातील देश सुरवातीपासुनच संशोधनात्मक प्रगत व बलाढ्य असल्याने.ते अण्वस्त्रधारी आणि संरक्षणधारी पण आहेत.जसे ब्रिटेन,जर्मनी,फ्रांस, इटली.

रशिया व चीन हे सुध्दा जगातील महाशक्ती आहेत. रशियाकडे जगातील सर्वात मोठा 'झार' नावाचा अणुबॉम्ब बनुन तयार आहे. सुरक्षाकवच पण आहे.

भारताकडे अशा देश सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा कवच आहे का? उत्तर आपल्याला नाही असेच मिळेल. मग याचे कारण काय, तर भारतातील लोकांनी भारत देशाला देशहिताच्या दृष्टीकोनातून कधी बघीतलेच नाही. म्हणून भारतात पाहिजे तशी संशोधनात्मक शैक्षणिक संस्था उभ्या केल्या गेल्या नाही.

त्यामुळे भारत नैसर्गिक साधनसामग्रीने धनसंपन्न असल्यावर सुध्दा. त्या नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर कसा करावा, हे समजणाऱ्या लोकांची कमतरता पडली. भारतात भरपूर लोकसंख्या आहे. भरपूर पैसा आहे. साधनसामग्रीआहे. पण पाहिजे तसे संशोधनात्मक शिक्षण नाही.पर्यायाने आमचा टॅलेंटपणा, आमच्या डोक्यात असलेल्या कल्पना जगाला दाखवता आल्या नाही.जी टेक्नोलॉजी तयार व्हायला पाहिजे होती, ती झाली नाही.

उलट गरीबी व बेकारीमुळे रिकामे लोकांच जास्त प्रमाण वाढले. त्यातुन रिकाम्या गप्पा मारणारांची संख्या वाढली. टिंगलटवाळी करणारांची संख्या वाढली,त्यातुनच वाईट व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढले.पत्ते खेळत बसणे, जुगार खेळणे,दारु पिणे.

याला कारणीभूत राज्यकारभार करणारे राज्यकर्ते आहेत. राज्यघटनेच्या कलम ४७ प्रमाणे फक्त मादक द्रव्य,व अंमली पदार्थाचा वापर फक्त औषध निर्मिती पुरताच असावा. बाकी सर्व मादक पदार्थ,व अंमली द्रव्य यावर बंदी असावी.आणि लोकांचे राहणीमान,पोषणमान,व आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करावे,असे राज्यघटनेत लिहलेले आहे.पण आमच्या राज्यकर्त्यांनी दारु, बियरची कारखाने उघडण्यासाठीच परवाणे दिले.जिकडे तिकडे दारुची दुकाने उभी राहिले.मग पिणाऱ्यांचंच प्रमाण जास्त वाढल. त्यामुळे लोकांमध्ये रोगाचे प्रमाण वाढले, मेंदू बधीर झाले. पोषनमान,राहणीमान व आरोग्यमान घसरले.म्हणजे घटनेच्या विरुद्ध दिशेने वाटचाल तर झालीच.मादकद्रव्य व अंमली पदार्थद्वारे संशोधनात्मक मेंदू घडवण्याऐवजी मेंदू बिघडण्याची कामे झाली.त्यामुळे देश संरक्षणाच्या दृष्टीने डोकी निर्माण झाली नाही. दारुमुळे लोकांचे राहणीमानाच बिघडून गेले. दारुमुळे कितीतरी लोकांचे संसार उध्वस्त झाले,कितीतरी अपघातात मेले, कितीतरी लोक शरीर प्रकृतीने रोगीष्ट झाले.राज्यघटनेच्या कलम ४७ प्रमाणे काम न केल्याचा हा एवढा दुष्परिणाम झाला!

राज्यकर्त्यांच्या अभयामुळे दारुचे कारखाने उघडणारांनी अरबों खरबों ची माया जुळवली, येथेच नाही तर परदेशात नेऊन ठेवली.तेही परदेशात पळुन गेले.

उद्या जर तिसरे महायुद्ध झाले तर,भारतीय लोक अणुबॉम्ब पासुन स्वतः चा बचाव करतील का? तशी साधने त्याच्याकडे आहेत का? असे कोणतेही साधन भारताजवळ नाही. कोणतेही कवच भारताकडे नाही. काही लोक म्हणतील आपल्याला काय घेणे देणे तिसऱ्या महायुद्धाच!पण आपल्याला सुध्दा त्याचा परिणाम भोगावा लागेल.हे विसरुन चालणार नाही.कारण हिरोशिमा वर अमेरिकेने जो अणुबॉम्ब टाकला होता,त्यावेळेस तेथे ४००डिग्री सेल्सियस तापमान वाढले होते.व दोन लाख लोक मरण पावले होते. आता तर लाखो पटीने बनवलेले अणुबॉम्ब आहेत त्याचे तापमान किती वाढेल,विचार करा. आपण कल्पनाही करु शकत नाही. म्हणून अब्ज, खरबोची संपत्ती जमा करणारांनो, परदेशात नेऊन ठेवणारांनो सावधान!

*********

विनोद सरदार
फुलेआंबेडकर विद्वतसभा
मो.नं.९६८९८४७११५

# मदरशांत नेमके काय शिकवले जाते? तेथील शिक्षकांना पगारवाढ का दिली?

मदरशांमध्ये केवळ धार्मिक शिक्षणच दिले जाते, असा एक सार्वत्रिक गैरसमज दिसतो. मदरशांना सरकारने आर्थिक मदत का द्यावी, हा प्रश्न हे या गैरसमजाचेच अपत्य. तिथे नेमके कोणत्या स्वरूपाचे शिक्षण दिले जाते, हे समजून घेणे गरजेचे आहे

सरकारने मदरशांमधील शिक्षकांच्या पगारात वाढ करण्याचा निर्णय घेतला आणि यावर चोहोबाजूंनी प्रतिक्रिया येऊ लागल्या. राज्य सरकार मग ते महाविकास आघाडीचे असो अथवा महायुतीचे- राज्यातील मदरशांसाठी काही प्रमाणात आर्थिक तरतूद करत असतेच. यावर अनेक जण टीका करतात. याला त्यांचा मदरशांबद्दल असलेला गैरसमजदेखील कारणीभूत असतो. मदरसे म्हणजे नक्की काय आणि सरकार कोणत्या मदरशांना मदत करते हे आपण या लेखात जाणून घेऊया भारतात सर्वांत प्रथम मदरसा तेराव्या



शतकाच्या आसपास दिल्लीत सुरू करण्यात आला. तेव्हा धार्मिक शिक्षण देणे हेच मुख्य उद्दिष्ट होता. मुघल काळात प्रशासनातील 'मुफ्ती' आणि 'काझी' या दोन पदांसाठी मदरशात शिक्षण घेतलेले असणे अनिवार्य होते. तेव्हा तिथे शिकणे अत्यंत प्रतिष्ठेचे मानले जाई. मदरशांमध्ये सर्वांत प्रथम आधुनिक शिक्षणाची सुरुवात १७८० पासून झाली. इंग्रज सरकार यासाठी आर्थिक मदत करते, पण १८५७ च्या उठावानंतर इंग्रज मुस्लिमांकडे संशयाच्या नजरेने बघू लागले आणि त्यांनी मदरशांना आर्थिक मदत देणे बंद केले. पुन्हा मदरसे धार्मिक शिक्षणाकडे वळले.

आता भारतातील कोणत्याही मदरशाची पाहणी केली तर त्यात जवळपास ९८ टक्के विद्यार्थी हे गरीब घरातील किंवा अनाथ असतात. गरीब मुस्लिमांची धारणा असते की आपल्याला सरकारी नोकरी मिळत नाही. त्यात मुलांना आधुनिक शिक्षण देण्याइतकी त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसते, मुलगा मदरशात शिकला तर एखाद्या मशिदीत मौलवी होईल आणि आपले पोट भरेल असे त्यांना वाटते. सधन मुस्लीम अपवादानेच आपल्या मुलांना मदरशांमध्ये पाठवतात.

२००६ मधील सच्चर कमिटीच्या रिपोर्टनुसार शाळेत जाणाऱ्या एकूण मुस्लीम विद्यार्थ्यांपैकी चार टक्के विद्यार्थी मदरशांमध्ये होते. २०१५-१६ मध्ये हे प्रमाण अडीच टक्क्यांपर्यंत कमी झाले. आणि सध्या सर्वेक्षण केल्यास प्रमाण एक ते दीड टक्क्यांपर्यंत घसरलेले असण्याची शक्यता आहे. प्रमाण कमी होण्याचे कारण म्हणजे मुस्लिमांमध्ये निर्माण झालेली शैक्षणिक जागरुकता, प्रसंगी उपाशी राहू पण मुलांना शिकवू अशी त्यांची भावना. आता महत्त्वाचे म्हणजे मदरशांमध्ये काय शिकवतात? बहुतेक मदरसे सरकारच्या मदतीविना चालतात, यांना मदत प्रामुख्याने लोकवर्गणीतून होते, आपण जर एखाद्या मोठ्या मशिदीबाहेर नमाज नंतर पहिले, तर अशा अनेक मदरशांमधून आलेले प्रतिनिधी लोकांना मदतीचे आवाहन करताना दिसतात. अशा मदरशांमधील बहुतेक विद्यार्थ्यांना जवळच्या उर्दू शाळेत दाखल केले जाते, शाळा आणि सोबत धार्मिक शिक्षण असे एकत्र सुरू असते. काहींना आधुनिक शिक्षण घ्यायचे नसते हाफीज, मुफ्ती, काझी इत्यादी बनतात.

कोणत्या मदरशांना सरकारकडून अनुदान आणि शिक्षकांना वेतन मिळते? मदरशातील मुलांना आधुनिक शिक्षण घेता यावे यासाठी केंद्र सरकारतर्फे १९९४ मध्ये मदरसा आधुनिकीकरण योजना सुरू करण्यात आली. यात गणित, विज्ञान, इंग्रजी हे विषय मदरशात शिकवता यावेत यासाठी सरकारतर्फे शिक्षकांना मानधन देण्यात येत होते. याच धर्तीवर २०१३ मध्ये महाराष्ट्र सरकारने डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना जाहीर केली.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या या योजनेनुसार मदरसा चालविणाऱ्या संस्थेची राज्यातील वक्फ बोर्डाकडे नोंदणी झालेली असणे गरजेचे आहे. या मदरशांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी नियमित शिक्षण घेण्यासाठी नजिकच्या शाळेत प्रवेश घालेला असावा, तसेच मदरशांमध्ये कंत्राटी शिक्षकांद्वारे गणित व विज्ञान हे विषय शिकविले जावेत, ते जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडून प्रमाणित करण्यात आलेले असावेत तसेच ते शिक्षक पदवीधर असावे. एका इमारतीत एकच मदरसा असावा इत्यादी नियम करण्यात आलेले आहेत. म्हणजे अनुदान त्याच मदरशांना मिळते जे सरकारने केलेले आधुनिक शिक्षणासंदर्भातील निकष पाळतात. त्यांचा अभ्यासक्रम सरकारच ठरवून देते. दहावीची परीक्षा जशी इतरांची होते तशीच मदरशांमधील विद्यार्थ्यांचीही होते. कोणताही विशेष अधिकार त्यांना मिळत नाही. मदरशांतील शिक्षकांचा पगार सहा हजारांवरून १६ हजार रुपये करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. २०१४ ते २०१९ या कालावधीत सरकारने केलेले आणि सध्याही करण्यात येत असलेले उत्तम कार्य म्हणजे मदरशांचे आधुनिकिकरण. यात सरकारने १०० कोटी रुपयांची तरतूदही केली होती. '२०१५ मध्ये मोदींनी मदरशांमधील विद्यार्थ्यांच्या एका हातात कुराण आणि दुसऱ्या हातात कॉम्प्युटर, बघायचा आहे,' असे वक्तव्य केले होते. त्याच पार्श्वभूमीवर केंद्राच्या अल्पसंख्याक मंत्रालयाने मदरशांसाठी विविध कार्यक्रम हाती घेतले आहेत. अनेक ठिकाणच्या मदरशांचे रूपांतर आता शाळा आणि हॉस्टेलमध्ये झाले आहे. उर्वरित मदरशांनीही आधुनिक शिक्षणासाठी दारे उघडायला हवीत आणि मुलांना त्यांच्या हक्काचे शिक्षण घेऊ द्यायला हवे.

# भेसळयुक्त कुंकू कसे ओळखावे? तज्ज्ञांनी सांगितल्या खास टिप्स

हिंदू धर्मामध्ये प्रत्येक शुभ कार्यात कुंकवाचा टिळा लावला जातो. कुंकवाला सौभाग्याचे प्रतीकही म्हटले जाते. पण, तुम्हाला माहीत आहे का की, कुंकू दूषित घटकांनीही बनवले जाऊ शकते? परंतु, यामुळे तुम्हाला घाबरण्याची आवश्यकता नाही. कारण– पनीर, लोणी आणि लसूण यांसारख्या पदार्थांमध्ये होणारी भेसळ ओळखल्यानंतर आता आम्ही तुम्हाला भेसळयुक्त कुंकू कसे ओळखायचे ते सांगणार आहोत.



डॉ. करुणा मल्होत्रा, सौंदर्य चिकित्सक, सौंदर्यशास्त्रज्ञ व कॉस्मेटिक स्किन अ‍ॅण्ड होमिओ क्लिनिक राजौरी गार्डन, नवी दिल्ली येथील त्वचातज्ज्ञ म्हणाल्या, भेसळयुक्त कुंकू ओळखणे अत्यंत आवश्यक आहे. कारण– काही भेसळयुक्त कुंकू त्वचेवर जळजळ किंवा इतर आरोग्य समस्या निर्माण करू शकतात. भेसळयुक्त कुंकू वापरण्याचे परिणाम त्वचेची प्रतिक्रिया : भेसळयुक्त कुंकवातील हानिकारक रसायनांमुळे लर्जी, पुरळ, खाज सुटणे व लालसरपणा येऊ शकतो. श्वसनासंबंधित समस्या : भेसळयुक्त कुंकवाच्या वापरामुळे श्वास घेताना श्वासोच्छ्वासाच्या समस्या उद्भवू शकतात. आरोग्य समस्या : भेसळयुक्त कुंकवाचा दीर्घकाळ वापर केल्याने मज्जासंस्थेचे नुकसान, मूत्रपिंड किंवा प्रजनन आरोग्य या समस्यांसह अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात, असे डॉ. मल्होत्रा म्हणाल्या. बनावट कुंकू कसे ओळखायचे? चमक, रंग तपासा भेसळविरहित कुंकवाचा रंग नैसर्गिक चमकदार लाल किंवा नारिंगी–लाल असतो. नकली किंवा भेसळयुक्त कुंकवामध्ये असामान्य चमकदार चमक किंवा अनैसर्गिक रंग असू शकतो, जो हानिकारक रंग किंवा रसायनांची उपस्थिती दर्शवतो, असे डॉ. मल्होत्रा म्हणाल्या.

रासायनिक सुवास

अस्सल कुंकवाला साधारणपणे तीव्र गंध नसतो. जर त्याला रसायने किंवा धातू (जसे की पारा) सारखा वास येत असेल, तर ते भेसळयुक्त असू शकते, असे डॉ. मल्होत्रा म्हणाल्या.

जल परीक्षण त्यासाठी कुंकू पाण्यात मिसळा. डॉ. मल्होत्रा यांच्या मते, शुद्ध कुंकू सहज पाण्यात विरघळेल; तर भेसळयुक्त कुंकू जोडलेल्या रसायनांमुळे रंग वेगळे करू शकतो. पारा आणि शिसे तपासा डॉ. मल्होत्रा म्हणाल्या, भेसळयुक्त कुंकवामध्ये लेड ऑक्साईड किंवा पारा सल्फाइड असते, जे आरोग्यासाठी धोकादायक असते. त्यामुळे लोकल मार्केटमधून कुंकू खरेदी करणे टाळा. योग्य प्रमाणीकरणासह विश्वासार्ह ब्रॅण्ड्सची निवड करा, असा सल्ला डॉ. मल्होत्रा यांनी दिला.

# महिनाभर दात न घासल्यास शरीरावर काय परिणाम होतात? डॉक्टरांनी सांगितल्या आरोग्याच्या गंभीर समस्या

शरीराच्या स्वच्छतेसोबतच आपल्या तोंडाची आणि दातांची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. गावाकडे दात स्वच्छ करण्यासाठी बहुतांशी कडुनिंबाच्या काड्यांचा वापर केला जातो. मात्र, आता बहुतांश भागांमध्ये टूथपेस्ट आणि टूथब्रशचा वापर केला जातो. रोज अंघोळ केली नाही तरी रोज सकाळी ब्रश नक्कीच केला जातो. परंतु, असे अनेक लोक आहेत की, ज्यांना ब्रश करायला फारच कंटाळा येतो. अशा परिस्थितीत हे जाणून घेणे फार महत्त्वाचे आहे की, जर एखाद्या व्यक्तीने महिनाभर ब्रश केला नाही, तर काय परिणाम होईल? तुमच्या दातांच्या स्वच्छतेकडे जास्त काळ दुर्लक्ष केल्यास तुमच्या एकूणच आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. तोंडात लाखो जीवाणू असतात आणि नियमित ब्रश न केल्यास हे जीवाणू वाढू शकतात आणि त्यामुळे श्वासाची दुर्गंधी किंवा दात पडणे यापलीकडे अनेक समस्या उद्भवतात. पीतमपुरा येथील क्राऊन हब डेंटल क्लिनिकच्या प्रोस्थोडॉन्टिस्ट डॉ. नियती अरोरा यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. नियती अरोरा सांगतात, तुम्ही ब्रश करणे बंद केल्यास पहिला बदल म्हणजे दातांवर मऊ प्लेक जमा होणे. हा जीवाणूंनी भरलेला थर हिरड्यांना त्रास देतो आणि त्यामुळे जळजळ होते. मग या फुगलेल्या हिरड्यांना स्पर्श केल्यास किंवा सौम्य ब्रश केल्याने अतिशय सहजपणे रक्तस्राव होतो. तसेच एक आठवड्यात दात कमकुवत होण्यास सुरुवात होते. तसेच प्लेक तयार झाल्यामुळे तोंडाला दुर्गंधी येऊ शकते. त्यामुळे तोंडाच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्याने केवळ दातांचे आरोग्यच खराब होत नाही, तर आपल्या एकूण आरोग्यावरही दुष्परिणाम होऊ शकतो. हृदयाच्या समस्या दात न घासल्याने विषारी द्रव्ये बाहेर पडतात आणि ती रक्तप्रवाहातून हृदयापर्यंत पोहोचण्याचा मार्ग शोधतात. त्यामुळे रक्तवाहिन्या बंद होणे आणि स्ट्रोक होण्याचा संभव असतो. तोंडाची दुर्गंधी महिनाभर ब्रश न केल्यास तोंडातून खूप वास येऊ लागेल; जे अगदीच सामान्य आहे. या दुर्गंधीमुळे तुम्हाला इतरांशी बोलणेही कठीण होईल. त्याशिवाय दातांचेही खूप नुकसान होते.



दातांवर थर जमा होईल महिनाभर दात न घासल्यास दातांवर अस्वच्छतेचा एक जाड थर जमा होईल, जो कितीही वेळा ब्रश केला तरी उतरणार नाही. मग त्यासाठी तुम्हाला डेंटिस्टची मदत घ्यावी लागेल. साहजिकच हा थर जमा होताच दातांचा पांढरा रंगही निघून जाईल.

मधुमेह दात न घासल्याने हिरड्यांमधील जळजळ वाढते आणि शरीराची क्षमता कमकुवत होते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते; ज्यामुळे जीवाणूंच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण तयार होते.

गर्भधारणेतील गुंतागुंत दातांचे खराब आरोग्य हे अकाली प्रसूती आणि बाळाचे कमी वजन यांच्याशी जोडलेले आहे. नियमितपणे दात न घासल्याने गंभीर दीर्घकालीन धोके उदभवू शकतात. त्यामुळे हाडांची लक्षणीय झीज होऊ शकते; ज्यामुळे दात सैल होतात आणि तुमच्या दातांची संरचना बिघडून, दात गळून पडतात. क्रॉनिक पीरियडॉन्टायटिस ही हृदयाशी संबंधित समस्या आहे आणि ती मधुमेह, संधिवात व गर्भधारणेदरम्यानची गुंतागुंत यांसारख्या आरोग्य समस्यांशी जोडली गेली आहे.

# तुमच्या घरामध्ये सूर्यफुलाचे रोप कसे लावायचे, जाणून घ्या

सूर्यफूल वनस्पती बागेचे सौंदर्य वाढविण्याचे काम करते. त्याची लागवड सहज करता येते. सूर्यफूल लावण्याची प्रक्रिया खूप सोपी आहे. मुलांनादेखील एक मजेदार क्रियाकलाप होऊ शकतो सूर्यफूल वनस्पती बागेचे सौंदर्य वाढवते. सूर्यफूल आरोग्यासाठीही फायदेशीर असून त्याच्या बियापासून काढलेले तेल अन्नात वापरले जाते. जर तुम्हाला बागकामाची आवड असेल तर तुम्ही तुमच्या घरच्या बागेत सूर्यफूल सहज लावू शकता. सूर्यफूल वाढवणे खूप सोपे आहे आणि मुलांसाठी देखील एक मजेदार क्रियाकलाप असू शकते. भांडीमध्ये सूर्यफूल वाढवण्यासाठी आपल्याला फक्त काही सोप्या गोष्टींची आवश्यकता आहे. सूर्यफूल वनस्पती कशी वाढवायची? तुम्हाला काय साहित्य लागेल सूर्यफूल बिया एक मोठे भांडे चांगल्या दर्जाची माती खत पाणी कसे वाढवायचे? बिया भिजवा बिया रात्रभर पाण्यात भिजत ठेवा. यामुळे बियाणे उगवणे सोपे होईल. भांड भांड्याच्या तळाशी काही छिद्र करा जेणेकरून पाणी वाहून जाईल. भांड्यात चांगल्या प्रतीची माती भरून त्यात कंपोस्ट खत घाला. बिया पेरा भिजवलेल्या बिया सुमारे २ इंच खोलीपर्यंत जमिनीत गाडून टाका. हेदेखील वाचा– गॅसवर ठेवल्यावर गोल फुगते रोटी, तासनतास ठेवून



होत नाही कडक पाणी माती थोडी ओलसर ठेवा. पण जमिनीत पाणी साचणार नाही याची काळजी घ्या. सूर्यप्रकाश द्या सूर्यफूल वनस्पतीला सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते. त्यामुळे भांडे अशा ठिकाणी ठेवावे जिथे त्याला भरपूर सूर्यप्रकाश मिळेल. सुपिकता दर दोन आठवड्यांनी एकदा झाडाला सुपिकता द्या. अतिरिक्त टिप्स भांड्याचा आकार सूर्यफूल वनस्पती मोठ्या आहेत. म्हणून एक मोठे भांडे निवडा. माती तुम्ही बाजारातून तयार मातीचे मिश्रणदेखील खरेदी करू शकता. खत तुम्ही सेंद्रिय खत वापरू शकता. कीटक झाडावर काही कीटक आढळल्यास आपण कडुलिंबाचे तेल वापरू शकता. सूर्यफूल वनस्पतीची काळजी कशी घ्यावी? पाणी माती नेहमी ओलसर ठेवा परंतु जास्त पाणी देऊ नका. खत रोपाला नियमितपणे खत द्या. कीटक कीटकांपासून वनस्पतीचे संरक्षण करा. सूर्यप्रकाश झाडाला भरपूर सूर्यप्रकाश द्या फुले कधी येतील साधारणपणे सूर्यफुलाच्या रोपाला फुल येण्यासाठी २–३ महिने लागतात. सूर्यफूल वाढवण्यासाठी योग्य जागा सूर्यफुलाची झाडे पुरेशा सूर्यप्रकाशात झपाट्याने वाढतात, म्हणून रोपांना थेट सूर्यप्रकाश मिळू शकेल अशा ठिकाणी ठेवा. जसजसे सूर्यफुलाचे झाड मोठे होत जाते, तसतसे त्याला अधिक सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते जेणेकरून त्याची देठ मजबूत आणि घट्ट होऊ शकते. रोपाची वाढ झाल्यानंतर, त्याला दररोज किमान ६ ते ८ तास सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते. सूर्यफुलाच्या फुलाचे डोके सूर्यासमोर असते आणि त्याला पुरेसा सूर्यप्रकाश न मिळाल्यास ते वाकते आणि झाडाच्या खोडाचेही नुकसान होते.

# चौकोनी ढोकळा खाऊन कंटाळा आला असेल तर सोप्या पद्धतीमध्ये घरी बनवा ग्लासातील खमण ढोकळा

गुजरातमधील फेमस पदार्थ म्हणजे खमण ढोकळा. गुजरातमधील प्रत्येक दुकानात ढोकळा हा पदार्थ मिळतोच. अनेकदा बाजारातून विकत आणलेला ढोकळा खाल्ला जातो. कारण घरी व्यवस्थित ढोकळा तयार होत नाही. अनेक लोक ढोकळा हा पदार्थ नाश्त्यामध्ये खातात. ढोकळा खाल्यानंतर पोटही लगेच भरते. घरी पाहुणे आल्यानंतर किंवा संध्याकाळी छोटी मोठी भूक लागल्यानंतर सगळ्यात आधी ढोकळ्याची आठवण येते. पण काहीवेळा घरी ढोकळा बनवताना तो व्यवस्थित बनत नाही.नेहमीच बाजारातून चौकोणी ढोकळा विकत आणला जातो. पण सतत तोच तोच ढोकळा खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना नवीन खाण्याची इच्छा सगळ्यांचं होते. अशावेळी तुम्ही ग्लासातला खमण ढोकळा बनवू शकता. हा ढोकळा बनवण्यासाठी फार सोपा आहे आणि कमीत कमी वेळ लागतो. चला तर जाणून घेऊया रेसिपी. साहित्य: बेसन हळद मीठ तेल इनो साखर सायट्रिक ॲसिड कृती: ग्लासातला ढोकळा बनवण्यासाठी सर्वप्रथम बेसनाचे पीठ चाळून घ्या. बाऊलमध्ये बेसन पीठ घेऊन त्यात चवीनुसार मीठ टाकून मिक्स करा. नंतर त्यात साखर, हळद, सायट्रिक ॲसिड टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या. नंतर त्यात पाणी टाकून सर्व साहित्य व्यवस्थित मिक्स करा. ढोकळा बनवताना तयार केलेले मिश्रण जास्त पातळ किंवा घट करू नये. नंतर त्यावर १० मिनिटं झाकण मारून ठेवा. १० मिनिटं झाल्यानंतर त्यात इनो टाकून मिक्स करा. ढोकळा बनवण्यासाठी स्टीमरमध्ये पाणी टाकून गरम करण्यासाठी ठेवा. ग्लासला तेल लावून त्यात ढोकळ्याचे मिश्रण टाकून व्यवस्थित सेट करा. स्टीमर गरम झाल्यानंतर त्यात ग्लास ठेवून ३० मिनिटं वाफवण्यासाठी ठेवा. ३० मिनिटं झाल्यानंतर ढोकळा तयार आहे की नाही हे स्टिकच्या सहाय्याने चेक करा. अशा पद्धतीने तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये तयार आहे ग्लासातील खमण ढोकळा ढोकळा बनवणे अत्यंत सोपे आहे.



मात्र याचे प्रमाण तुम्ही योग्य ठेवायला हवे. ढोकळा बनविण्यासाठी लागणारे साहित्य योग्य प्रमाणात घेतल्यास तुमची कृती आणि चव यांचा ताळमेळ बसण्यास मदत मिळते हे नक्की. तुम्हालाही संध्याकाळसाठी काय स्नॅक्स खावे असा प्रश्न पडला असेल तर तुम्ही या रेसिपीचा नक्कीच उपयोग करून घेऊ शकता.

# अल्पवयीन मुलीची छेड काढल्याप्रकरणी आरोपीस ३ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद एल. यावलकर यांचा महत्वपूर्ण निकाल

बीड/प्रतिनिधी :– गेवराई तालुक्यतील एका गावातील अल्पवयीन मुलीची छेडछाड केल्याप्रकरणी बीड येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी किरण कांबळे याला दोषी ठरवुन ३ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आहे. याप्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, गेवराई तालुक्यातील एका गावात पिडीता ही तिच्या आजी व आजोबा सोबत घराच्या बाहेर अंगणात झोपली असता रात्री तेथे येवुन आरोपीने पिडीता झोपलेली असता वाईट हेतुने तिचा विनयभंग केला. पिडीता जागी होवून ओरडली असता आरोपी तेथुन पळुन गेला. त्यानंतर पिडीतेच्या आईच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन चकलांबा येथे आरोपी विरूद्ध कलम ३५४(ड) भादवी व पोक्सो कायद्याच्या कलम ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल झाला होता. प्रकरणात तपासाअंती पोलीसांनी सदर प्रकरणाचे दोषारोपपत्र बीड येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय यांचे कोर्टात दाखल केले होते. सदर प्रकरणात सरकारपक्षातर्फे एकूण ६ साक्षीदार तपासण्यात आले. प्रकरणात पिडीत मुलीची साक्ष महत्वाची ठरली व तिने आरोपीला न्यायालयात ओळखले. सरकार पक्षातर्फे सादर करण्यात आलेला भक्कम पुरावा व सहा. सरकारी वकिल अ‍ॅड. मंजुषा दराडे यांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरून बीड येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. आनंद एल. यावलकर साहेब यांनी आरोपीस कलम ८ पोक्सो कायद्यान्वये दोषी ठरवुन ३ वर्षे सक्त मजुरी व रू. १००० दंडाची शिक्षा ठोठावली तसेच कलम १२ पोक्सो कायद्यान्वये एक वर्ष सक्त मजुरी व ५००/– दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सरकारपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता अ‍ॅड. मंजुषा एम. दराडे यांनी कामकाज पाहिले त्यांना अ‍ॅड. बी.एस. राख व पैरवी अधिकारी म्हणुन श्री. नागमवाड व श्री. मिसाळ यांनी सहकार्य केले.

# कोण होणार मुख्यमंत्री, महायुतीत बेबनाव!

मुंबई : विशेष प्रतिनिधी महायुती आणि ‘मविआ’चा मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार घोषित करण्यावरून दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये खडाखडी सुरू असतानाच ‘मला मुख्यमंत्री पदाचे डोहाळे लागलेले नाहीत’, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत:हून घोषित केले. एकिकडे शिंदे यांचा उद्वेग बाहेर पडत असतानाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयावर सूचक मौन बाळगले.

विधानसभा निवडणुकीचे रणशिंगे वाजल्यानंतर महाराष्ट्रामध्ये प्रचाराच्या रणधुमाळीला सुरूवात झाली आहे. राज्यात सत्ताधारी महायुती आणि विरोधी पक्षांतील महाविकास आघाडी यांच्यातच मुख्य लढत रंगणार आहे. मात्र मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण असावा आणि तो घोषित करावा का, यावरून मतभेद आहेत. सत्ताधारी महायुतीनेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव पुढील मुख्यमंत्री म्हणून जाहीर केलेले नाही. मात्र महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेमधून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या मुख्यमंत्रिपदाच्या चेह–याबाबत सूचक विधान केले. एकंदरीत महायुतीत देखील भावी मुख्यमंत्र्याविषयी अद्याप एकमत नसून या ‘ति–घाडी’मध्ये बेबनावाचे वारे घुमत असल्याचे दिसू लागले आहे. पत्रकार परिषदेमध्ये महायुतीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण असेल, अशी विचारणा करण्यात आली असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्हाला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करण्याची गरज नाही. आमचे मुख्यमंत्री तर इथे बसलेले आहेत. मात्र फडणवीस यांनी या दरम्यान मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून कुणाचंही नाव घेतलं नाही. यावेळी फडणवीस यांनी महाविकास आघाडीने शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करावा, असे आव्हान दिले.



फडणवीस पुढे म्हणाले की, महाविकास आघाडी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करत नाही आहे, कारण निवडणुकीनंतर त्यांचा मुख्यमंत्री बनेल, असं त्यांना वाटत नाही. मी शरद पवार यांना आव्हान देतो की, त्यांनी आपला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करावा. दरम्यान, यावेळी एकनाथ शदिंे यांनीही महायुतीच्या मुख्यमंत्रिपदाच्या चेह–याबाबत स्पष्टपणे काहीही विधान केलं नाही. आमच्या सरकारचं दोन वर्षांपासूनचं काम आणि कामगिरी हाच महायुतीचा चेहरा आहे. आता महाविकास आघाडीने त्यांच्या नेत्याला आपला चेहरा घोषित केलं पाहिजे, असे ते म्हणाले.

